# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी, जि. ठाणे

## जाहिर सूचना

## (प्रारूप मतदार याद्यांच्या प्रसिध्दीबाबत)

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक २०१७ करीता मतदार याद्यांच्या प्रसिध्दीचा कार्यक्रम मा. राज्य निवडणूक आयोगाने आदेश क्र. रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र.२१/का.५, दि. ०८/०३/२०१७ अन्वये निश्चित केलेला आहे.

मा. राज्य निवडणूक आयोगाच्या उक्त आदेशाप्रमाणे महानगरपालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणूकीसाठी महानगरपालिकेच्या २३ प्रभागांच्या प्रारुप मतदार याद्या आज दि. १४/०३/२०१७ रोजी मुख्य निवडणूक कार्यालय, महानगरपालिकेची सर्व प्रभाग कार्यालये (१ ते ५) येथे प्रसिध्द करण्यांत येत आहेत. तसेच महानगरपालिका संकेतस्थळ www.bncmc.gov.in वर सूध्दा उपलब्ध आहे.

| प्रभाग समिती क्रमांक | पत्ता | समाविष्ट होणारे प्रभाग |
|---|---|---|
| १ | मनपा कार्यालय, जुनी इमारत, दुसरा मजला कापआळी, भिवंडी | ३, ४, १०, ११ |
| २ | मनपा कार्यालय, जुनी इमारत, तिसरा मजला कापआळी, भिवंडी | ९, १२, १३, १४, १५ |
| ३ | भि.नि.श. मनपा शाळा क्र. २३, ५९, ६७ च्या समोर असलेली नवीन इमारत, पद्मानगर, भिवंडी | १६, १७, २१, २२, २३ |
| ४ | कै. परशराम टावरे क्रिडा संकूल लगत असलेली इमारत, तळ मजला, भिवंडी | ७, १८, १९, २० |
| ५ | मंडई येथील गणपती मंदिराच्या बाजूची इमारत, पहिला मजला, प्रभूआळी, भिवंडी | १, २, ५, ६, ८ |

सदर प्रारूप मतदार याद्यांवर दिनांक १४/०३/२०१७ ते दिनांक १८/०३/२०१७ या कालावधीत नागरिकांकडून हरकती व सूचना मागविण्यात येत आहेत. सदर हरकती व सूचना True Voter Mobile App वर स्विकारण्यात येणार आहेत. True Voter Mobile App हे Google Play Store ला मोफत उपलब्ध आहे. तसेच ज्या नागरिकांना True Voter Mobile App चा वापर करता येत नसल्यास त्यांचेकरीता प्रत्येक प्रभाग कार्यालयामध्ये मदत केंद्राची स्थापना करण्यात आलेली आहे. वरील मुदतीनंतर प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांचा विचार करण्यात येणार नाही.

प्रारूप मतदार याद्या मनपा मुख्य निवडणूक कार्यालय, धोबी तलाव, प्रभाग समिती क्र. ४ व महापालिकेचे सर्व प्रभाग कार्यालये येथे पाहणेसाठी उपलब्ध असून त्या महानगरपालिकेच्या मध्यवर्ती निवडणूक कार्यालय, प्रभाग समिती क्रमांक ४, भिवंडी येथे विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

**ठिकाण :- भिवंडी**
**दिनांक :- १४/०३/२०१७**

**आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**